पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/ ३२/२०१४
दिनांक – ०९/०१/२०१४

प्रति,

मा.....................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची सभा दिनांक १५/०१/२०१४ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १५/०१/२०१४ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत -

१) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १६**

दिनांक :- १५/०१/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १५/०१/२०१४ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक ०१/०१/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १५)** सभावृत्तांत कायम करणे.

---------

**विषय क्र.१)** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील किंवा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील विविध प्रयोजनासाठी असलेल्या आरक्षणाखालील जमिनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतूदीनुसार संपादित करणे आवश्यक असून त्यासाठी उक्त अधिनियमांचे कलम १२६ मधील तरतूदीनुसार संपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच या संपादनासाठी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाद्वारे भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. केवळ स्थायी समितीच्या मंजूरीने जिल्हाधिकारी यांना सादर केलेले भूसंपादन प्रस्ताव वैध नसल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. असे निदेश शासनाने त्यांचेकडील पत्र क्र.टिपीएस-१८०७/५५९/प्र.क्र.६६७/०७/नवि-१३, दि.०७/०६/२००८ अन्वये दिलेले आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजूर विकास योजनेतील मिळकती (मौजे पिंपळे निलख शिव ते वाकड शाळा चौक - स.नं.२४२पै., २४४पै. ते २५१पै., २५७पै. ते २६३पै., २६५पै. व २६६ पै., २६९पै. ते २७२पै., २७६पै.ते २७८पै.) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन करणेबाबतचा भूसंपादन प्रस्ताव फक्त मा.स्थायी समितीचे मंजुरीने मा.जिल्हाधिकारी यांना सादर केलेला आहे. सदर ठिकाणच्या दि.२९/०१/२००८ रोजी घोषित झालेल्या निवाडयातील मिळकती सोड्न सदर भूसंपादन प्रकरणातील स.नं.२७६पै. (सिसनं.२८९पै.), २७७पै. (सिसनं.२८८पै., २८७पै., २८६पै., २८५पै., २८४पै., २८३पै. व २८२पै.), स.नं.२७८पै. मिळकती आणि स.नं.२४२पै. (सिसनं.२८१पै.), स.नं.२४४पै. (सिसनं.७७३पै.),

स.नं.२४७पै. (सिसनं.८४३पै.), स.नं.२४९पै. (सिसनं.८७३पै., १९३१पै., ९१०पै.), स.नं.२५९पै. (सिसनं.१९४०पै.), स.नं.२७२पै. (७८७पै.), स.नं.२५७पै. (सिसनं.१९३०पै.),स.नं. २६०पै. (सिसनं.२७३७पै., २७३८पै.) मधील क्षेत्र दुरुस्ती असलेल्या मिळकतीचा भूसंपादन प्रक्रिया प्रस्ताव क्र.नरवि/कावि/३अ/२/९०/२००४, दि.२०/०५/२००४ भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ४८ अन्वये प्रथमत: माघारी घेण्यास मान्यता देण्यात यावी.

सदरचा रस्ता हा बीआरटीएस रस्ता असून केंद्र सरकारचे जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत विकसित करणेत येत आहे. त्यामुळे मूळ विषयाप्रमाणे स.नं.२७६पै. (सिसनं.२८९पै.), २७७पै. (सिसनं.२८८पै., २८७पै., २८६पै., २८५पै., २८४पै., २८३पै. व २८२पै.), स.नं.२७८पै.या मिळकती आणि स.नं.२४२पै. (सिसनं.२८१पै.), स.नं.२४४पै. (सिसनं.७७३पै.), स.नं.२४७पै. (सिसनं.८४३पै.), स.नं.२४९पै. (सिसनं.८७३पै., १९३१पै., ९१०पै.), स.नं.२५९पै. (सिसनं.१९४०पै.), स.नं.२७२पै. (७८७पै.), स.नं.२५७पै. (सिसनं.१९३०पै.), स.नं.२६०पै. (सिसनं.२७३७पै., २७३८पै.) या मिळकतीसाठीच मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजूर विकास योजनेतील मौजे पिंपळे निलख शिव ते वाकड शाळा चौक यामधील मिळकती ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतूदीनुसार तातडीचे कलमासह भूसंपादन करणेचे प्रस्तावास नव्याने मान्यता मिळणेकरीता मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

(टिप : दिनांक १५/०१/२०१४ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.२)** आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर योजनेनुसार आकुर्डी येथील सर्वे नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आलेले आहे. सदरचे आरक्षण पिंपरी चिंचवड मनपा नियंत्रण क्षेत्रात येत आहे. या आरक्षणासाठी पोहच रस्ता ९ मीटर रुंदीचा आहे. हा ९ मीटर रुंदीचा रस्ता शाळेसाठी अरुंद असून अपुरा आहे. तसेच या आरक्षणामध्ये रहिवासी घरे, चर्च असून सुमारे ८० टक्के क्षेत्र इमारतीने व्यापलेले आहे. या शाळेच्या लगतच्या परिसरामध्ये सेंट उर्सुला हायस्कूल, ट्रिनिटी विद्यालय, सरस्वती विद्यालय, म्हाळसाकांत विद्यालय तसेच पिं.चिं.मनपाचे आकुर्डी शाळा आहे. तरी या आरक्षणानुसार आता शाळेची आवश्यकता नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता सदरचे आरक्षण क्र.५४८ नुसार शाळेसाठी आरक्षित जागा आरक्षणामधून वगळून रहिवासी निवासी विभागात समाविष्ठ करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन सदरचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

(टिप : दिनांक १५/०१/२०१४ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.३)** नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत ज्या विविध मागासवर्गीय कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये काही योजना बंद करणे, काही योजनांमध्ये सुधारणा करणे व नविन योजना सुरु करणे प्रस्तावित असून मागासवर्गीय कल्याणकारी योजनेतील विविध कल्याणकारी योजनेमध्ये सुधारित बदल करणेकामी प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ नुसार अ. क्र. १ ते २ योजनांना मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/४/कावि/३२/२०१४
दिनांक - ०९/०१/२०१४

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.